सारांश पत्रिका

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे
विद्याशाखे अंतर्गत समाजशास्त्र विषयात पीएच.डी.
(विद्यावाचस्पती) पदवीकरिता सादर करावयाचा
शोधप्रबंधाची अंतिम सारांश पत्रिका.

संशोधन विषय

"आंतरजातीय विवाहितांचा सामाजशास्त्रीय अभ्यास"
विशेष संदर्भ बीड जिल्हा

संशोधक

प्रा. विलास भगवानराव भिल्लारे
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
चौसाळा, ता. जि.बीड.

मार्गदर्शक

प्रा.डॉ. दादासाहेब मोटे
प्रपाठक, समाजशास्त्र विभागप्रमुख कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, जालना.

जुलै-२०१३.

" आंतरजातीय विवाहितांचा सामाजशास्त्रीय अभ्यास "

विशेष संदर्भ बीड जिल्हा

१) प्रास्ताविक :

मानवी जीवनाचा आधार म्हणजे संस्कृती होय. ही संस्कृती काही एकदम उदयाला आलेली नाही, तर त्यासाठी कित्येक वर्षे लागली आहेत. मानवी संस्कृती ही नितिमूल्यावर आधारित आहे. समाजाच्या चाली-रितींमधून संस्कृती गुंफली गेली आहे. समाजातील व्यक्तींच्या जीवनाला दिशा देण्याचे कार्य संस्कृती करते. मनुष्याच्या वेग,वेगळया गरजांची पूर्तता ही समाज व्यवस्था करत असते. त्यामध्ये विवाहसंस्थेचा सिंहाचा वाटा आहे. माणसाच्या इतर गरजाप्रमाणेच मैथुन ही देखील गरज आहे. यातून शारीरिक गरज भागवली जाते व समाजाचे अस्तित्व टिकवून सामाजिक समतोल साधला जातो. कारण स्त्री-पुरुषांच्या काम-वासना तृप्त झाल्या नाही तर त्यांच्यामध्ये अनेक प्रकारच्या मानसिक विकृती निर्माण होतात. म्हणून स्त्री-पुरुषांच्या कामवासना तृप्त होण्यासाठी विवाह हया सामाजिक संस्थेची निर्मिती करण्यात आली.

विवाहाची सुरुवात कधीपासून झाली हे नेमकेपणाने सांगणे अतिशय कठीण आहे कारण अगदी प्राचीन काळी जेव्हा मनुष्य रानटी अवस्थेत जीवन जगत होता त्यावेळी लैगींक स्वैराचार होता. त्यातून पुढे अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाल्याने विवाह संस्थेचा उदय झाला असे समाज शास्त्रज्ञांचे मत आहे. विवाहाद्वारे स्त्री-पुरुषांच्या स्वैचाराला आळा घालून त्यांना मर्यादित करण्यात आले. विवाहबाहय संबंधाना अनैतिक संबोधले गेले. 'मॅलिनॉव्हस्कीच्या' शब्दात सांगावयाचे तर, "विवाह म्हणजे केवळ शारीरिक उपभोगाचा परवाना नसून तो "मातृत्व-पितृत्व" प्राप्त करुन घेण्याचा परवाना होय. विवाहामुळे कौटुंबिक संरचनेची निर्मिती झाली.

पुढे जातीयतेच्या अस्तित्वानंतर मात्र विवाहाला जाती अंतर्गत विवाहानांच समाज मान्यता मिळाली. जातीबाहय विवाह समाजात नाकारण्यात आले. परंतु काळाच्या ओघात जातीबाहय विवाह ही होऊ लागले. शिक्षण, समाज-सुधारकांचे कार्य, नवीन जीवन मूल्ये, इत्यादी मुळे समाजात आंतरजातीय विवाह घडु लागले. परंतु आज देखील खुल्या मनाने समाजामध्ये आंतरजातीय विवाहीतांचे स्वागत होत नाही. समाज त्यांच्याकडे अपराध्यांच्या नजरेने पाहतो. त्यांना समाजात समावून घेतले जात नाही. त्यांच्या अपत्यांकडे ही वेगळया नजरेने पाहिले जाते. त्यांचा कोणताही अपराध नसतांना त्यांना कुटुंब व समाजामध्ये अवहेलना सहन करावी लागते. आंतरजातीय विवाह केलेल्या दांपत्यांच्या मुला-मुलीं बरोबर जातीतील लोक विवाह करावयाला तयार होत नाहीत. त्यामुळे त्यांच्या कोंडमारा होतो. यातून त्यांना अनेक सामाजिक समस्यांना तोंड द्यावे लागते. आंतर जातीय विवाहीतांच्या अनेक समस्या आहेत त्यापैकीच सामाजिक समस्यांची तिव्रता ही अधिक आहे म्हणून संशोधकाने ही समस्या संशोधनासाठी निवडली आहे. आंतरजातीय विवाहीतांच्या समस्यांचा ऊहापोह दैनंदिन वृत्तपत्रे व नियत कालीकातील लेखन व पुस्तकांमधून देखील झालेला दिसतो. हया समस्येची चर्चा अनेक वर्षापासून होत आहेत.

अलीकडील काळात समाजशास्त्रज्ञ, सामाजिक कार्यकर्ते व संशोकांच्या चितंनाचा हा विषय झालेला आहे. या समस्येच्या संदर्भात सर्वांगाने विचार झालेला दिसून येत नाही. व हया बाबींचा समाजावर अतिशय विपरित परिणाम होत आहे. म्हणून ही समस्या संशोधनासाठी घेण्यात आली आहे.

संशोधन समस्येचे महत्व :-

आंतरजातीय विवाहीतांची समस्या ही ज्वलंत समस्या आहे. त्यांच्या समोर विविध समस्या निर्माण होतात. त्यांच्या अपत्याच्या विवाहाचे काय? त्यांची समाजात होणारी अवहेलना कशी थांबवावी ? असे एक ना अनेक प्रश्न आंतरजातीय विवाहीतांच्या समोर

निर्माण होतात. हा प्रश्न अत्यंत गहन आहे. त्यांची तीव्रता समाजातील सर्वापर्यंत पोहोचलेली आहे. आंतरजातीय विवाहीतांच्या समस्या हया फार पूर्वीपासून आहेत. हया समस्यांचा अभ्यास समाजशास्त्रीय दृष्टीने करणे गरजेचे आहे. कारण कोणत्याही सामाजिक समस्येचा परिणाम हा संपूर्ण सामाजिक जीवनावर पडलेला दिसून येतो. आंतरजातीय विवाहीतांच्या सामाजिक जीवनावर कोणत्या गोष्टींचे चांगले वाईट परिणाम होतात व त्यामध्ये कोणत्या गोष्टी परिणामकारक ठरतात हे संशोधनाशिवाय समजत नाही. आंतरजातीय विवाहीतांच्या सामाजिक समस्यांचा अभ्यास करने अतिशय गरजेचे आहे. या समस्येची परिणामकारकता अभ्यासणे आवश्यक आहे.

संशोधन समस्येची गरज :-

आंतरजातीय विवाहीतांची संख्या खुप मोठी आहे. ग्रामीण व शहरी भागाची तुलना केली असता शहरांमध्ये आंतरजातीय विवाहीतांची संख्या खेडयांपेक्षा जास्त आहे व त्यांच्या प्रश्नांची तीव्रताही अधिक आहे. आंतरजातीय विवाहीतांच्या समस्या हया भिन्न स्वरुपाच्या आहेत. काही समस्या हया सौम्य आहेत. यावर देखील संशोधन होणे आवश्यक आहे.

आंतरजातीय विवाहीतांच्या सामाजिक समस्यां बरोबरच त्यांना आर्थिक, मानसिक व इतर समस्यांनाही तोंड द्यावी लागते. त्यामध्ये भाषा, रुढी, परंपरा, राहणीमान इत्यादी गोष्टींचा देखील मोठया प्रमाणात अडसर ठरतो. त्याबरोबरच भूप्रदेश आणि त्या त्या समाजाची संस्कृती हया गोष्टी देखील फार मोठा अडसर ठरतात. त्यासाठी निकोप सामाजिक वातावरणाची गरज आहे. बीड जिल्हयातील आंतरजातीय विवाहीतांच्या ही विविध समस्या आहेत. त्यात त्यांच्या मुला-मुलींच्या विवाहाचा प्रश्न मोठा आहे. या समस्यांचा अभ्यास करुन उपाय योजना करणे आवश्यक आहे.

संशोधनाची उदिदष्टये :-

प्रस्तुत विषयाचे अध्ययन सर्वव्यापी व सर्व स्पर्शी होऊन संशोधकाला निश्चित दिशा देण्यासाठी काही उदिदष्टे गृहित धरुन प्रस्तुत अभ्यासाची मांडणी केली आहे.

१) बीड जिल्हयातील आंतर जातीय विवाहीतांच्या वैयक्तिक व कौंटुबिक समस्यांचा अभ्यास करणे.
२) बीड जिल्हयातील आंतरजातीय विवाहीतांच्या समस्यांचा अभ्यास करणे.
३) बीड जिल्हयातील शहरी व ग्रामीण आंतरजातीय विवाहीतांच्या समस्यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.
४) बीड जिल्हयातील आंतरजातीय विवाहीतांच्या दैनंदिन अडचणींचा अभ्यास करणे.
५) बीड जिल्हयातील आंतरजातीय विवाहीतांच्यास जीवनाशी निगडीत असणा-या इतर समस्यांचा शोध घेणे.
६) बीड जिल्हयातील आंतर जातीय विवाहीतांच्या समस्या जाणून त्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी उपाय योजना सुचविणे.

संशोधन अभ्यासाची गृहितके :-

१) बीड जिल्हयातील आंतरजातीय विवाहितांच्या अनेक समस्या आहेत.
२) बीड जिल्हयातील आंतरजातीय विवाहितांना समाजामध्ये म्हणावे तेवढे समाविष्ट करुन घेतले जात नाही.
३) बीड जिल्हयातील आंतर जातीय विवाहितांच्या समस्या हया जातीय विवाहितांपेक्षा वेगळया आहेत.
४) अनेक आंतरजातीय विवाहितांच्या मुलांचे विवाह योग्य वयात होत नाहीत.

संशोधन पदध्ती :-

"आंतरजातीय विवाहितांचा समाजशास्त्रीय अभ्यास". विशेष संदर्भ बीड जिल्हा या प्रस्तुत संशोधन अभ्यासात परीचात्मक, अनवेशांत्मक व विश्लेषण पदध्तीचा अवलंब केला आहे.

संशोधनाचे स्वरुप:-

संशोधनाचे स्वरुप हे समाजशास्त्रीय पध्दतीचे आहे. या संशोधन पध्दतीत ग्रंथालयीन व क्षेत्रिय अध्ययनांचा वापर करण्यात आला आहे. या अनुषंगाने प्राथमिक व द्वितीय स्त्रोताचा उपयोग अध्ययनासाठी केला आहे.

संशोधनाची व्याप्ती:-

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधनाचे कार्यक्षेत्र हे बीड जिल्हा निवडला असुन या जिल्हयातील सर्वच तालुक्यातील आंतरजातीय विवाहीताची निवड करण्यात आली आहे.

माहिती संकलन :-

बीड जिल्हयातील आंतरजातीय विवाहीताचा अभ्यास करत असतांना संशोधनाची माहिती संकलीत करण्यासाठी प्राथमिक आणि द्वितीय स्त्रोताचा आधार घेतला आहे.

अ) प्राथमिक स्त्रोत:- या अध्ययनासाठी माहिती संकलन करण्यासाठी मुलाखत, अनुसूची, निरीक्षणाचा वापर करुन सदरील संशोधनाची माहिती संकलीत केली आहे.

ब) द्वितीय स्त्रोत:- द्वितीय स्त्रोत म्हणुन तथ्य संकलनासाठी संदर्भग्रंथ, जनगणना अहवाल, सामाजिक संस्था, (एनजीओ), मॅरेज ब्युरो, महाराष्ट्र शासनाकडील

माहिती, प्रकाशित तसेच अप्रकाशित साहित्य, मासिके, वर्तमान पत्रे, इत्यादी माध्यमातून उपयुक्त माहिती मिळविली आहे.

नमुना निवड पध्दती :-

"बीड जिल्हयातील आंतरजातीय विवाहीताचा समाजशास्त्रीय अभ्यास" विशेष संदर्भ बीड जिल्हा. याचा अभ्यास करण्यासाठी सहेतुक पध्दतीने १०० आंतरजातीय उत्तरदात्यांची निवड केलेली आहे.

प्रकरण सारांश

प्रकरण पहिले :-

प्रस्तुत प्रकरणामध्ये सामाजिक संस्थेचा आढावा घेवुन कुटूंबसंस्था व विवाहसंस्था म्हणजे काय? त्याचा अर्थ, व्याख्यांचा अभ्यास केला असुन विवाहाचे प्रकार याचा अभ्यास केला आहे. तसेच सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक परिवर्तनाचे घटक यांचा देखील प्रस्तुत प्रकरणामध्ये अभ्यास केला आहे. आंतरजातीय विवाहाविषयी वेगवेगळया विचारवंताची मते याचा देखील प्रस्तुत प्रकरणात अभ्यास करण्यात आला आहे.

प्रकरण दुसरे :-

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन पध्दतीची मांडणी केलेली आहे त्यामध्ये संशोधनाचे महत्व, संशोधनाचा उदेदश, संशोधनाची अध्ययन क्षेत्र, संशोधनाची तंत्र, संशोधनातील नमुना निवड, तथ्य संकलन आणि विश्लेषण, संशोधकाला आलेले अनुभव संशोधनाची व्याप्ती, मर्यादा इत्यादी विषयाची या प्रकरणामध्ये मांडणी करण्यात आली आहे.

प्रकरण तिसरे :-

प्रस्तुत प्रकरणामध्ये उत्तरदात्याची वैयक्तिक व कौटुंबिक माहिती याचा अभ्यास केला असुन उत्तरदात्याची शैक्षणिक पात्रता, धर्मविषयक माहिती, उपजीवीकेचे साधने, व्यवसाय, उत्तरदात्याचे आर्थिक उत्पन्न, घरातील सदस्य संख्या, त्याच्या घरातील इतर नातेवाईकांच्या विवाहाचे स्वरुप, यांचा अभ्यास केला आहे. त्याच बरोबर उत्तरदात्यांना आंतरजातीय विवाहामुळे सामाजिक, आर्थिक, मानसिक त्रास झाला काय ? या सर्व बाबींचा प्रस्तुत प्रकरणामध्ये अभ्यास केला आहे.

प्रकरण चौथे :-

या प्रकरणामध्ये आंतरजातीय विवाहीतांच्या वैवाहीक जीवनाची माहिती घेण्यात आली असुन, आंतरजातीय विवाहीतांच्या विवाहापुर्व व विवाहानंतर नातेवाईकांच्या संबंधाविषयी अभ्यास करण्यात आला आहे.

प्रकरण पाचवे :-

प्रस्तूत प्रकरणामध्ये संशोधन विषयाच्या अनुषंगाने ज्या अभ्यासकाने, संशोधकानी, लेखकांनी आंतरजातिय विवाहीताचा अभ्यास केलेला आहे. त्यांनी या अभ्यासात मांडलेल्या या आंतरजातीय विवाहाच्या संदर्भात वेगवेगळया मांडलेला भुमीकांचा आढावा घेण्यात आला आहे.

अ) निष्कर्ष व शिफारशी :-

प्रस्तुत विषय "आंतरजातीय विवाह आणि सामाजिक परिवर्तन: एक समाजशास्त्रीय अभ्यास" यावर संशोधन करण्यात आले आहे. संशोधन कार्यातंर्गत संशोधिकेने काही गृहीतकृत्यांना तपासून घेण्याचा प्रयत्न केला आहे. उदा. भारतीय समाजामध्ये आंतरजातीय विवाहाचे प्रमाण वाढत आहे. आंतरजातीय विवाहामुळे जातीय विविधता दूर करण्यास मदत होत आहे, आंतरजातीय विवाहित जोडप्यांना समाजात

योग्य दर्जा प्राप्त होतो आणि आंतरजातीय विवाहित दाम्पत्य विविध समस्यांना सामोर जाऊन आपला विवाह यशस्वी करत आहे.

१) भारतीय समाजामध्ये आंतरजातीय विवाहाचे प्रमाण वाढत आहे.

२) आंतरजातीय विवाहाचे प्रमाण शिक्षणामुळे वाढत आहे.

३) आंतरजातीय विवाहामुळे जातीय विविधता दूर होण्यास मदत होते.

४) आंतरजातीय विवाहित जोडप्यांना समाजात योग्य दर्जा प्राप्त होतो.

५) आंतरजातीय विवाहित दाम्पत्य विविध समस्यांना सामोरे जाऊन आपला विवाह यशस्वी करत आहे.

ब) शिफारशी

१) आंतरजातीय विवाहीत जोडप्यांना नोकरीत सामावून घेणे.

२) या जोडप्यांच्या मुलांना शैक्षणिक सवलती देणे.

३) त्यांना कायद्याच्या माध्यमातून, आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि सांस्कृतिक संरक्षण देणे.

४) आंतरजातीय विवाह करु इच्छिणाच्या जोडप्यांनी विवाहपूर्वी सामुपदेशकाकडे जाऊनच विवाहाचा निर्णय घ्यावा.

५) जाति अंताचा लढा म्हणुन सर्व स्थरातील लोकांनी याला पाठींबा देवून त्यात सहभागणी व्हावे.

संशोधक

प्रा. विलास भगवानराव भिल्लारे
कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा ता.जि. बीड

मार्गदर्शक

डॉ. मोटे डी. यू.
प्रपाठक समाजशास्त्र विभागप्रमुख
कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय,जालना